महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ५७ वे | दिनांक : १६/०२/२०२६ | वार : मंगळवार

## टिपू सुलतानांचे वंशज भाजपमध्ये गेल्यास त्यांनाही पदे दिली जातील:हर्षवर्धन सपकाळांचा पलटवार



**मुंबई :** काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपवर तीव्र टीका करत भाजपला संविधान बदलायचे आहे, असा गंभीर आरोप केला आहे. सोमवारी बुलढाणा येथे माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी विविध मुद्द्यांवर भूमिका स्पष्ट केली. विशेषतः भाजप आणि टिपू सुलतान यांच्याभोवती सुरू असलेल्या वादावर त्यांनी भाष्य केले. भाजप संविधानातील महापुरुषांविषयी कायम आक्षेप घेत असल्याचा आरोप करत, टिपू सुलतानाबाबतही भाजपचे धोरण तस्सेच असल्याचे त्यांनी म्हटले.

सपकाळ यांनी सांगितले की, भाजप नेते देवेंद्र फडणवीस हे टिपू सुलतानांविरोधात सातत्याने बोलतात. मात्र राज्यातील नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकांदरम्यान काही ठिकाणी फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सभांमध्ये स्टेजच्या पार्श्वभूमीवर टिपू सुलतानाचे चित्र लावलेले दिसले, असा दावा त्यांनी केला. राजकीय सोयीनुसार भूमिका बदलण्याचे हे उदाहरण आहे, असे ते म्हणाले. पुढे ते म्हणाले की, उद्या टिपू सुलतानांचे वंशज भाजपमध्ये दाखल झाले तर त्यांनाही मोठी पदे दिली जातील, अशी टीकाही त्यांनी केली.

सहा सोनेरी पाने, या पुस्तकाचा उल्लेख करत सपकाळ यांनी स्वा. सावरकर यांच्या लिखाणावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल चुकीचे लिहिलेले असल्याचा आरोप त्यांनी केला. शिवाजी महाराजांच्या सज्जनपणाला विकृती म्हणण्याचे धाडस करण्यात आले आहे. स्वराज्य स्थापन होणारच होते; पण कावळा बसायला आणि डांग तुटायला जसे होते, तसे शिवाजी महाराज आले, असा उल्लेख त्या पुस्तकात आहे, असे ते म्हणाले. अशा विचारांना भाजप मान्यता देते, असा आरोपही त्यांनी केला. गोंधळ निर्माण करणे हे भाजपचे धोरण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शिवाजी महाराजांविषयी आपली भूमिका स्पष्ट करताना सपकाळ म्हणाले की, शिवाजी महाराज अद्वितीय आहेत आणि त्यांचे कार्य व कर्तृत्व अनुपम आहे. ते रयतेचे राजे होते आणि त्यांच्या विषयी कोणतेही चुकीचे विधान आपण केलेले नाही. दोन वेगवेगळ्या कालखंडातील महापुरुषांबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता, त्या संदर्भात आपण मत मांडले, असे त्यांनी सांगितले. राज्यात सध्या जाती-धर्मात तेढ निर्माण होत असल्याने सर्व महापुरुषांचे फोटो समकक्ष पातळीवर लावावेत का, असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्या अनुषंगाने आपण बोललो, असे त्यांनी स्पष्ट केले.

सपकाळ पुढे म्हणाले की, शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची संकल्पना दिली आणि ते बहुजनांचे हिरो आहेत. त्यांच्या प्रेरणेनेच टिपू सुलतानांनी कार्य केले, असे ऐतिहासिक संदर्भ आहेत. त्यामुळे दोघांचे फोटो एकत्र लावले तर त्यात गैर नाही, असे आपण मत व्यक्त केले होते. मी कुठेही शिवाजी महाराजांचा अपमान केलेला नाही. मात्र माझ्या वक्तव्याचा विपर्यास करून 'ध'चा 'मा' करण्यात आला, असे त्यांनी सांगितले. आपले वक्तव्य चुकीच्या पद्धतीने सादर करण्यात आले, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

## मुंबई महापालिकेत पहिली महिला विरोधी पक्षनेता : किशोरी पेडणेकरांच्या नावाची घोषणा



**मुंबई :** महापालिका निवडणुकीनंतर आशियातील सर्वात श्रीमंत अशा मुंबई महापालिकेकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. मुंबई महापालिकेवर भाजप-शिवसेना शिंदे गटाची सत्ता स्थापन झाली आहे. आता पुढील कामकाजाच्या दिशेने हालचाली सुरू झाल्याचे दिसत आहे. महत्त्वाच्या असलेल्या स्थायी समिती, शिक्षण समिती आणि सुधार समितीच्या सदस्यांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. विशेष म्हणजे महापालिकेच्या विरोधी पक्षनेते पदावर शिवसेना ठाकरे गटाच्या किशोरी पेडणेकरांची निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे मुंबई महापालिकेतील त्या पहिल्या महिला विरोधी पक्षनेत्या ठरल्या आहेत.

महापौर रितू तावडे यांनी महापालिकेतील समितीच्या सदस्यांच्या नावाची घोषणा केली आहे. त्यानुसार स्थायी समिती आणि सुधार समितीवर 26 जणांची तर शिक्षण समितीवर 22 जणांची निवड करण्यात आली आहे. महापालिकेतील पक्षीय बलाबलच्या आधारे या सदस्यांची निवड करण्यात आली आहे.

महापालिकेतील महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या स्थायी समितीवर भाजपचे सर्वाधिक 10 सदस्य आहे. त्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे 7, शिंदे सेनेचे 4, कॉंग्रेसचे 3, मनसे आणि एमआयएमचा प्रत्येकी एक सदस्य निवडला गेला आहे. दरम्यान, मुंबई महापालिकेत शिवसेना ठाकरे गटाला इतर पक्षांपेक्षा जास्त मते मिळाली असल्याने महापालिकेचे विरोधी पक्षनेतेपद ठाकरेंच्या किशोरी पेडणेकर यांच्याकडे देण्यात आले आहे. किशोरी पेडणेकर या मुंबईच्या माजी महापौर देखील आहेत.

किशोरी पेडणेकर या मुंबई महापालिकेतील पहिल्या महिला विरोधी पक्षनेत्या ठरल्या आहेत. मुंबई महापालिकेत 1998 मध्ये महापौरांसह परिषद पद्धती लागू करण्यात आली होती. त्यानंतर 1999 मध्ये ही पद्धत रद्द करून जुन्या पद्धतीचे पुनरुज्जीवन करण्यात आले. याच काळात उपमहापौर आणि विरोधी पक्षनेता या पदांची तरतूद करण्यात आली. 2000 सालापासून विरोधी पक्षनेते पद अस्तित्वात आले असून गेल्या 25 वर्षातील किशोरी पेडणेकर या पहिल्या महिला विरोधी पक्षनेत्या आहेत. आता पर्यंत कॉंग्रेसकडे असलेले हे पद प्रथमच शिवसेना ठाकरे गटाकडे आले आहे.

## राज्य सरकारने थकीत शेतकरी कर्जदारांचा डेटा मागवला; आगामी अर्थसंकल्पात कर्जमाफीबाबत मोठी घोषणा शक्य




**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नावर राज्य सरकारने महत्त्वाची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. राज्य सरकारकडून राज्यातील सर्व बँकांना थकीत कर्जदार शेतकऱ्यांची सविस्तर माहिती शासनाच्या शिंदे समितीकडे पाठवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांसाठी काही सकारात्मक घोषणा होऊ शकतात, अशी चर्चा रंगू लागली आहे. विशेषतः थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांमध्ये या हालचालींमुळे आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

जून 2025 पर्यंत थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्याचे काम विविध जिल्हा बँकांमार्फत सुरू आहे. नाशिक जिल्हा बँकेनेही या प्रक्रियेत पुढाकार घेतला असून सुमारे 74 हजार शेतकऱ्यांची माहिती राज्य सरकारच्या अधिकृत पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. उर्वरित शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्याची प्रक्रिया अद्याप सुरू आहे. यामुळे संपूर्ण राज्यातील थकीत कर्जदारांचा अचूक आकडा शासनासमोर येणार आहे.

नाशिक जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद शिंदे यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, राज्य शासनाच्या मदतीसाठी एक समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीकडून 30 जून 2025 ते 30 सप्टेंबर 2025 या कालावधीतील थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती मागवण्यात आली आहे. जिल्ह्यातील सेवा सहकारी सोसायट्या, त्यांचे सचिव, बँकेचे तपास अधिकारी आणि शाखाधिकारी यांच्या माध्यमातून माहिती संकलन सुरू आहे. तसेच सहनिबंधक आणि निबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांचेही सहकार्य मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

या संपूर्ण प्रक्रियेचा उद्देश म्हणजे राज्यातील खऱ्या अर्थाने थकीत असलेल्या शेतकऱ्यांची स्पष्ट यादी तयार करणे हा आहे. शासनाच्या पोर्टलवर माहिती अपलोड झाल्यानंतर पुढील निर्णय घेणे सोपे जाणार आहे. कर्जमाफीचा निर्णय घ्यायचा झाल्यास अचूक आकडेवारी महत्त्वाची ठरणार असल्याचे प्रशासनातील सूत्रांचे म्हणणे आहे. त्यामुळे बँकांकडून माहिती संकलन आणि पडताळणी या दोन्ही गोष्टींना प्राधान्य दिले जात आहे.

दरम्यान, राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन 23 फेब्रुवारी 2026 पासून सुरू होणार आहे. हे अधिवेशन 25 मार्च 2026 पर्यंत चालणार असून 6 मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. राज्याच्या विधिमंडळाचे हे महत्त्वाचे अधिवेशन मुंबईत पार पडणार आहे. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर कर्जमाफीचा विषय अधिकच चर्चेत आला आहे. शेतकरी वर्गाचे लक्ष आता अर्थसंकल्पाकडे लागले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १७ फेब्रुवारी २०२६


## कला महाविद्यालयामध्ये व्यसनमुक्ती अभियान यशस्वी




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर संलग्नित, एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, कला महाविद्यालय बिडकीन या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत भारत व्यसनमुक्ती अभियान जनजागृती अंतर्गत विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते अण्णासाहेब थिटे हे उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रसाद करंदीकर या दोघांचा कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. मिलिंद ठोकळे यांनी केले तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश गायकवाड यांनी केले . सुरवातीला प्रमुख पाहुणे अण्णासाहेब थिटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यसन हे शरीरासाठी अतिशय हानिकारक आहे हे मानवाला माहीत असून सुद्धा मादक पदार्थ, दारू ,तंबाखू , ड्रग्स यांसारख्या सवयींच्या आहारी जाऊन आजचा तरुण म्हणजेच युवा स्वत: व्यसनाच्या आणि शारीरिक मानसिक गुलामगिरीत लोटला गेला आहे. शारीरिक व्याधी कर्करोग ,हृदयविकार, कौटुंबिक कलह, आणि आर्थिक नुकसान होऊनही आजचा युवा सर्व गोष्टी विसरून परत व्यसन करतो म्हणजे केवळ वाईट सवयी नसून मेंदूच्या रचनेत बदल करणारा हा आजार आपण निर्माण करून घेत आहोत हे जाणून भारतीय नागरिकांनी आणि युवा शक्तींनी व्यसनापासून दूर राहिले पाहिजे नशा येणाऱ्या पदार्थाचे वारंवार सेवन करण्याची सक्ती मन आणि शरीर याच्यावर परिणाम करते म्हणूनच विद्यार्थ्यांनी स्वतःला अभ्यासात झोकून घ्यावे असे सांगितले. शेवटी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक स्वयंसेविका यांनी व्यसनमुक्ती वरती भित्तीपत्रक आणि निबंध लिहून व्यसनमुक्ती जनजागृती संदेश बिडकीन तालुका पैठण जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथील महाविद्यालया बरोबर येथील सर्व नागरिकांचे प्रबोधन रॅलीच्या माध्यमातून करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण महाराष्ट्र शासन तंबाखू, गुटखा नियंत्रण माणसउपचार समिती छत्रपती संभाजीनगर डॉ. प्रसाद करंदीकर यांनी सोशल मीडिया बघून आजचा युवा व्यसनाधीन तिकडे कसा वळला आहे या गोष्टीवर भाष्य केले. युवा पिढीने आणि विद्यार्थ्यांनी स्वतःला सावरून स्वतःच्या आणि कुटुंबाच्या बरोबर देशाला सावरण्याची गरज आहे असे संबोधित केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या अंतर्गत महाविद्यालयांमध्ये भित्तीपत्रक, निबंध स्पर्धा व जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयातील स्वयंसेवक विशाल आवटी यांनी केले आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे उदघाटन संपन्न



**कन्नड (प्रतिनिधी) :** येथील शिवाजी महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार सेवा केंद्र विभाग यांच्या वतीने दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन , व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळा आयोजित करण्यात आली. (ता. १६ व १७ )या कार्यशाळेचे उदघाटन प्रसिद्ध वक्ते प्रा. रंगनाथ लहाने यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून संपन्न झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय भोसले हे होते. प्रा. लहाने म्हणाले की, आपली संस्कृती ही त्यागाची व संस्काराची आहे. प्रगती करावयाची असेल तर यशाचा मार्ग हा शिक्षणातून जातो. महापुरुषांच्या जीवन व कार्यातून प्रेरणा घेवून जीवनात यशस्वी व्हा ! युवकांनी मोठी स्वप्ने पाहिली पाहिजे. अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. विजय भोसले म्हणाले की, विद्यार्थ्या नी शिक्षणाकडे व जीवनाकडे आनंदाने पाहिले पाहिजे. त्यासाठी जिद्द, चिकाटी व मेहनत असेल तर जीवनात खुप मोठे होता येते असे मत व्यक्त करून विद्यार्थ्यांनी आपल्यातील गुणांचा विकास करून घेतला पाहिजे. असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक कार्यक्रम समन्वयक डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले. त्यांनी कार्यशाळेची भूमिका विशद केली. दुसऱ्या सत्रात व्यक्तिमत्व विकास या विषयावर डॉ. आर. एम. घोती यांनी मार्गदर्शन केले. तर डॉ. मंगेश जाधव यांनी स्पर्धा परिक्षा या विषयावर मार्गदर्शन केले.मंचावर उपप्राचार्य डॉ. बी.के. मगर, डॉ. आर. एम. घोती ,कार्यक्रम समन्वयक डॉ. रामचंद्र झाडे यांची उपस्थिती होती. या प्रसंगी डॉ. शिवाजी हुसे, डॉ. उदय डोंगरे, डॉ. संजय भालेराव, डॉ. के. एल. भानुसे, डॉ. जी.के. बुरसे ,डॉ. आर.के. पवार, डॉ. पी.के. संघई, डॉ. मीना वडगुळे यांच्यासह विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले. आभार डॉ. आर.के. पवार यांनी मानले.

## अंजना स्कूल ऑफ एक्सलन्स येथे दहावी बोर्ड परीक्षा केंद्र मंजूर

**दौलताबाद (जावेद अहमद) :** तळेसामन (आसेगाव)तालुका गंगापूर येथील अंजना स्कूल ऑफ एक्सेलेन्स या विद्यालयास सन २०२५-२६ च्या इयत्ता दहावीच्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अंतर्गत घेण्यात येणाऱ्या बोर्ड परीक्षेसाठी अधिकृत परीक्षा केंद्र मंजूर झाले आहे.या केंद्रावर एकूण २३७ विद्यार्थी परीक्षा देणार असून सर्व विद्यार्थ्यांचे बैठकी क्रमांक शाळेमार्फत अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आले आहेत. बैठकी क्रमांकांची यादी शाळेच्या सूचना फलकावर लावण्यात आली असून विद्यार्थ्यांनी ती पाहून खात्री करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.परीक्षा दिनांक २० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत घेण्यात येणार आहे.परीक्षा सुरळीत व शिस्तबद्ध वातावरणात पार पडावी यासाठी विद्यालयात स्वतंत्र वर्गव्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृह व्यवस्था तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. केंद्रावर कोणताही गैरप्रकार होऊ नये व परीक्षा शांततेत पार पडावी यासाठी दौलताबाद पोलीस स्टेशन यांच्यामार्फत आवश्यक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्नेहा पवार यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत सर्वांनी वेळेपूर्वी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे तसेच प्रवेशपत्र (हॉल तिकीट) व आवश्यक साहित्य सोबत आणावे, असे आवाहन केले आहे. शासन व मंडळाच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**

**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**

**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १७ फेब्रुवारी २०२६

## वडिलांवरील टीकेनंतर लेक उतरली मैदानात : हर्षवर्धन सपकाळांच्या लेकीने टीकांकरांना दिले सडेतोड उत्तर





**मुंबई :** महाराष्ट्रात सध्या नवा वाद सुरू झाला आहे. कंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांशी करत वादग्रस्त विधान केले होते. टिपू सुलतानला छत्रपती शिवरायांच्या समकक्ष मानले गेले पाहिजे असे त्यांनी म्हटले होते. यावरून भाजपने त्यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. त्यात आता वडिलांवर होणारी टीका सहन न झाल्याने सपकाळ यांची मुलगी गार्गी सपकाळ आता मैदानात या मैदानात उतरल्या आहेत.

माझ्या वडिलांचे मूळ वक्तव्य अतिशय स्पष्ट आणि संदर्भासह होतं. “शिवाजी महाराजांचा पराक्रम अद्वितीय आहे. त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन टिपू सुलतान यांनी कार्य केलं. महाराजांप्रमाणेच त्यांनी कुठल्याही विखारी, विषारी विचारांना थारा दिला नाही, हा त्या वक्तव्याचा आशय होता, असे गार्गी यांनी म्हटले.

गार्गी सपकाळ म्हणाल्या, माझ्या वडिलांच्या, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या विधानावरुन सध्या राज्यात जाणीवपूर्वक गदारोळ उभा केला जात आहे. हा वाद छत्रपती शिवाजी महाराजांच्या सन्मानासाठी नाही, तर त्यांच्या नावाचा राजकीय गैरवापर करून विरोधकांना बदनाम करण्याचा हा एक सुनियोजित प्रयत्न आहे. ज्यांनी सातत्याने महाराजांच्या विचारांना आणि इतिहासाला विकृत करण्याचं काम केलं आहे, तेच आज अचानक अपमान झाल्याचं ढोंग करत आहेत, हीच या संपूर्ण गदारोळामागची खरी राजकीय चाल असल्याचा आरोप गार्गी यांनी केला आहे.

गार्गी सपकाळ म्हणाले, विविध जाती आणि धर्मांमध्ये दिवसेंदिवस वाढत चाललेल्या तेढीच्या पार्श्वभूमीवर काही संघटनांनी अशी मागणी केली होती की सर्व शासकीय कार्यालयांमध्ये महामानवांचे फोटो लावावेत, ज्यात छत्रपती शिवाजी महाराजांसोबत टिपू सुलतान यांचेही फोटो असावेत. 'या मागणीकडे आपण कसं पाहता?' असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्या प्रश्नाच्या उत्तरात, वरील संदर्भात हे वक्तव्य करण्यात आलं. पण आज त्याच वक्तव्याचा हेतुपुरस्सर विपर्यास केला जात आहे.

पुढे गार्गी सपकाळ म्हणाल्या, यांच्याच लाडक्या भगतसिंग कोश्यारी यांनी 'शिवाजी महाराज आता जुने झाले, नवे आयडॉल नितीन गडकरी' अशी अपमानास्पद तुलना केली, फुले दाम्पत्याचा अपमान केला, तेव्हा या सत्ताधाऱ्यांच्या तोंडातून एक शब्दही निघाला नाही. उलट अशा व्यक्तीला महाराष्ट्रभूषण देऊन त्यांनी महाराजांप्रती आपली खरी मानसिकता उघडी पाडली. कोरटकर या मा. फडणवीसांच्या जवळच्या व्यक्तीकडून महाराजांचा अपमान होतो, तेव्हा हे गप्प बसतात. 'मोदी म्हणजे शिवाजी महाराज' अशी इतिहासाची विकृती करणाऱ्या महंतांना प्रश्न विचारत नाहीत. राजमाता जिजाऊसाहेबांबद्दल वादग्रस्त आणि अवमानकारक लिखाण करणाऱ्या बाबासाहेब पुरंदरेंना कधी जाब विचारला गेला नाही. म्हणजे जेव्हा अपमान त्यांच्या विचारसरणीतून होतो तेव्हा तो चालतो, हीच या सत्ताधाऱ्यांची दुटप्पी, दडपशाही आणि निवडक नैतिकतेची राजकारणाची परंपरा असल्याची टीका गार्गी यांनी केली आहे.

गार्गी सपकाळ म्हणाल्या, माझे वडील छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर करणारे आणि त्यांच्या समता, न्याय व लोककल्याणाच्या आदर्शांवर विश्वास ठेवणारे व्यक्ती आहेत, हे वेगळं सांगण्याची गरज नाही. पण ज्यांना महाराजांचा हा समतेचा आणि न्यायाचा विचार मान्य नाही, ज्यांना फक्त प्रतीकांचा दिखावा प्रिय आहे, तेच लोक समाजात द्वेष पसरवतात. दंगली घडवण्याचं वातावरण तयार करतात आणि स्वार्थी राजकारणासाठी महाराजांच्या नावाचा वापर करतात. हा तर खरा महाराजांचा अपमान आहे. स्वराज्य म्हणजे प्रेम, शांतता, न्याय आणि लोकांचा सन्मान. पण महाराजांना मानणारे म्हणवून घेऊन जर लोकांची डोकी फोडली जात असतील, तर तो कुठला विचार आहे? या वादानंतर फेक आयडी तयार करून मला अत्यंत गलिच्छ, स्त्रीद्वेषी आणि अपमानास्पद शिव्या दिल्या जात आहेत. ज्यांना खरंच महाराज कळले असते, ते असं वागले असते का? पण त्यांच्या कार्यशाळा, शाखा आणि प्रचारयंत्रणांमधून जर सातत्याने द्वेषच पेरला जात असेल, तर त्याचेच प्रतिबिंब समाजात दिसणार, यात आश्चर्य ते काय?

शिवराय, जोतिबा—सावित्री फुले, छत्रपती शाहू महाराज, अहिल्याबाई होळकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक महामानवांचा सामाजिक न्याय, समता आणि कल्याणकारी राज्याचा विचार हा आरएसएसच्या ब्राह्मणवादी विचारसरणीच्या मूलत: विरोधात आहे, त्यांना तो मान्य नाही. म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माझ्या वडिलांच्या शब्दांचा विकृत अर्थ लावून, महाराष्ट्रात हिंदू—मुस्लिम तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत, तेही शिवजयंतीच्या उंबरठ्यावर! हे एक स्पष्ट राजकीय षड्यंत्र असल्याचा गंभीर आरोप गार्गी सपकाळ यांनी केला आहे. तसेच महाराजांच्या महाराष्ट्रात अशा प्रकारे दूषित वातावरण तयार करून जयंती साजरी करायची, ही वैचारिक विकृतीच म्हणावी लागेल. ज्यांची माथी भडकवली जात आहे, त्यांनी हे ओळखायला हवं की फडणवीस आणि ज्या विचारसरणीतून ते प्रेरित आहेत, ती तुमची फसवणूक करत आहे. तुम्हाला, देशाचं आणि महाराष्ट्राचं ऐक्य जपणाऱ्या माणसांच्या विरोधात उभं केलं जात आहे. आपण अजून किती दिवस या विकृतीला बळी पडणार? ही विकृती तुमचं आयुष्य, तुमचं समाजजीवन आणि शेवटी देशाचं भविष्य उद्ध्वस्त करेल. यापासून सावध राहणं हाच आजचा खरा देशभक्तीचा मार्ग असल्याचे त्या म्हणाल्या.

गार्गी सपकाळ यावेळी सपकाळ घराण्याचा संबंध भोसले आणि जाधवांशी असल्याचे सांगताना म्हणाल्या, शेवटी, महाराजांचा विचार काय आहे हे आम्हाला शिकवण्याचा प्रयत्न करू नये. आम्हाला वैचारिक वारशासोबत पारिवारिक वारसा लाभलेला आहे. आमच्या कुटुंबाला छत्रपती शिवाजी महाराजांच्या थेट वारशाशी आणि मराठा राजघराण्यांशी जवळचा संबंध आहे. माझ्या वडिलांची मावशी राजर्षी शाहू महाराजांच्या कदमबांडे घराण्यात लग्न झालेली होती. तसेच, माझ्या आजीचे वडील देवासचे सरदार जाधव होते, जे सिंदखेड राजाच्या जाधव घराण्याशी (जिजाऊ मातोश्रींच्या घराण्याशी) जोडलेले आहेत. आणि माझी आत्या बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड यांच्या वंशज घराण्यात विवाहित आहे. हे सर्व नाते भोसले आणि इतर मराठा राजघराण्यांशी जोडते, पण माझे वडील या ऐतिहासिक वैभवाचा राजकीय उपयोग कधीच करत नाहीत. ही बाब महत्वाची वाटते. ज्यांचा इतिहास अन्याय, शोषण आणि स्त्रीद्वेषाचा राहिलेला आहे, ज्यांना इथली जातीय उतरंड कायम ठेवायची आहे, ज्यांनी सत्तेसाठी गद्दारीची परंपरा जोपासली आहे अशा विचारसरणीच्या लोकांनी तरी महाराजांच्या विचारांचे धडे महाराष्ट्राला देण्याचं ढोंग करू नये. महाराष्ट्र तुमचे डावपेच ओळखतो.

महाराष्ट्रातील सर्व पक्षीय आणि सर्व धर्मीय बांधवांना माझं एवढंच सांगणं आहे की, आपल्याला प्रेम, करुणा, न्याय आणि बंधुतेच्या मूल्यांवर उभं राहायचं आहे, आणि याच मूल्यांवर महाराष्ट्र घडवायचा आहे. सत्य ओळखा, आणि सत्याच्या बाजूने एकजुटीने उभे राहा. खऱ्या स्वराज्यासाठी एकत्र लढा, असे आवाहन गार्गी सपकाळ यांनी केले आहे.

दरम्यान, गार्गी सपकाळ या लंडन स्थित एका महाविद्यालयात पब्लिक हेल्थवर शिक्षण घेत आहे व सोबतच दवा आणि दुवा प्रकल्प राबवत आहेत. वडील हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर होणाऱ्या टीकेला प्रत्युत्तर देण्यासाठी त्यांनी त्यांच्या सोशल मीडियावर पोस्ट लिहीत सडेतोड उत्तर दिले आहे.

## सीलबंद न्याय

किती सील मारणार फाईल्सवर?
किती कुलुपं लावणार सत्यावर?

लोखंडी दरवाजे उभे केले तरी
किंकाळ्यांना थांबा नसतो—
त्या भिंतींवरून प्रतिध्वनी परत
येतात.

तुमच्या टेबलांवर
कागदांचे डोंगर असतील,
पण पानोपानी
जिवंत आवाज धडधडतो—
शाईत मिसळलेला श्वास.

सत्तेच्या कॉरिडॉरमध्ये
मौनाला पदकं जडतात,
आणि प्रश्न विचारणाऱ्यांवर
देशद्रोहाचे शिक्के उमटवले
जातात.

लक्षात ठेवा—
भीती तुमची ढाल असेल,
तर संताप आमची मशाल आहे;
मशालींचा प्रकाश
कुलुपांची भाषा मानत नाही.

आम्ही नावं मागतो—
सूडासाठी नाही,
विस्मृतीविरुद्ध साक्ष म्हणून.

आम्ही सत्य मागतो—
कोलाहलासाठी नाही,
पुढची पिढी सुरक्षित राहावी म्हणून.

दडवलेलं प्रत्येक नाव
विश्वासावर ओरखडा कोरतो,
प्रत्येक उशीर
न्यायाच्या पावलांना बेडी घालतो.

ही लढाई फक्त रस्त्यांची नाही—
ही विवेकाची कसोटी आहे:
कोण उभं राहील,
कोण वाकेल,
आणि कोण विकेल आपलं मौन.

शेवटी इतिहास लिहिला जाईल—
सत्तेने अंधार जपला,
पण लोकांनी उजेड पेटवला.

घोषणा एकच—
सत्य दडपणार नाही.
न्याय थांबणार नाही.

**प्रभाकर गायकवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## मी मोठ्ठी झाल्यावर!

आई,मी मोठ्ठी झाल्यावर
गॅसवर स्वयंपाक करणार
तू पाटावर बसून
पुरणपोळी जेवणार !

आजी, मी मोठ्ठी झाल्यावर
करणार देवाची पूजा
तू हाती जपमाळ घेऊन
कामाला द्यायची रजा !

बाबा, मी मोठ्ठी झाल्यावर
ऑॅफीसला जाणार
महीन्याचा पगार
तुमच्या हाती देणार !

ताई, मी मोठ्ठी झाल्यावर
कॉलेजला जाणार
खूप अभ्यास करून
पहिला नंबर मिळविणार!

आजोबा, मी मोठ्ठी झाल्यावर
सेवा तुमची करणार
देवदर्शनासाठी मंदिरात
हात धरून नेणार!



**रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६




**फुलंब्री तालुक्यातील खामगाव येथे महाशिवरात्री निमित्त ग्रामदैवत सद्गुरू चैतन्य श्री गोरक्षनाथ महाराजांचा महाभिषेक आरती संपन्न**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १७ फेब्रुवारी २०२६


## संप्रदायासोबत सामाजिक बदलाची चळवळ देशभर उभी रहावी - आकांक्षा चौगुले



**उमरगा :** संप्रदायासोबत सामाजिक बदलाची चळवळ देशभर उभी राहावे असे विचार आकांक्षा चौगुले यांनी मॉर्निंग वॉकच्या वतीने आयोजित भजन संध्या या कार्यक्रमाच्या सत्कार प्रसंगी त्यानी व्यक्त केले. मॉर्निंग वॉक च्या वतीने गजानन महाराज मंदिर उमरगा या ठिकाणी भजन संध्या कार्यक्रम संयोजन केलं होतं.या कार्यक्रमाला तालुक्यातील नामवंत,गुणवंत,संगीतकार,गीत कार यांना मॉर्निंग वॉकच्या वतीने निमंत्रित करण्यात आलं होतं.कार्यक्रमाच्या प्रसंगी गायक वादक यांचा सत्कार कार्यक्रम ठेवण्यात आला होता.याप्रसंगी धर्म, संस्कृती,शिक्षण हे सातत्याने बदलणारी प्रक्रिया आहे.आणि ती निरंतर चालल्याने समाज एक संघ राहील असे प्रतिपादन आकांक्षा चौगुले यांनी केले.कार्यक्रममध्ये दयानंद पाटील,पांडुरंग सुरवसे,एड. इंगळे सर,श्रीमान भागवत फुकटे.प्रो.मुरली जाधव,सुनील माने,अनिरुद्ध बाबळसुरे,पंडित शिंदे सर,सोहम कुंभार, विजयकुमार कांबळे यांच्या सुमधुर आवाजातून अभंग संध्या हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून पंढरीचा पांडुरंग जणू उमरगा या ठिकाणी अवतरले अशीच अनुभूती येत होती. कार्यक्रमाचे व्यवस्थापन आणि सूत्रसंचालन भूमिपुत्र वाघ यांनी केले तर या कार्यक्रमाला आवर्जून बळी मामा सुरवसे यांना निमंत्रित केलं होतं. कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये इंजिनिअर बाबरे सर,माने गुरुजी,कुमार तळीखेडे, राम पतंगे,गजानन महाराज मंदिर समितीचे सर्व व्यवस्थापक यांचा विशेष सहभाग होता. कार्यक्रमामध्ये गायन आणि वादन केलेल्या सर्व मान्यवरांचे आकांक्षा चौगुले यांच्या शुभ हस्ते समाज विकास संस्थेच्या वतीने कवयित्री कै सरूबाई डोके यांच्या जातीवरील ओव्या आणि भूमिपुत्र वाघ यांचा आभाळमाया हा काव्यसंग्रह देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाज विकास संस्थेचे कार्यकर्ते अक्षय कामले यांनी विशेष परिश्रम घेतले... तर आभार एड.इंगळे यांनी मानले.

# कवयित्री प्रिया धारूरकर यांच्या कवितासंग्रहाचे प्रकाशन




**छत्रपती संभाजतीनगर :** 'कवयित्री प्रिया धारूरकर यांच्या 'चाहुलींचे अनवट नाद' या कवितासंग्रहातून स्त्रीच्या देहमनाचा वेध घेतला आहे,' असे निरीक्षण नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख आणि सुप्रसिद्ध कवी, समीक्षक डॉ. पी. विठ्ठल यांनी नोंदवले. प्रिया धारूरकर यांच्या या कवितासंग्रहाचे समर्थनगरमधील शासकीय ग्रंथालयाशेजारच्या गांधी भवनात रविवार, 15 फेब्रुवारी रोजी सायंकाळी प्रकाशन झाले. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाचे विशेष म्हणजे कवयित्री प्रिया धारूरकर यांच्या आई मालती राघवेंद्र मुरुगकर यांच्या हस्ते या कवितासंग्रहाचे प्रकाशन झाले. ज्येष्ठ कवयित्री ललिता गादगे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. तर छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव आत्माराम जिगे, प्रकाशक कैलास अतकरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.


डॉ. पी. विठ्ठल यांनी प्रिया धारूरकर यांच्या कवितांच्या विविध पैलूंवर सविस्तर भाष्य केले. ते म्हणाले की, 'धारूरकर यांच्या या संग्रहात सुमारे 85 कविता असून त्यातून मानवी नातेसंबंधांचा आणि विशेषतः स्त्रियांच्या भावविश्वाचा उच्चार करण्यात आला आहे. ही कविता 'बाई'पणाच्या विविध स्थितीगतीचे आणि प्रेमानुभवाच्या पार्थिव-अपार्थिव भावस्थितीचे आरेखन करते. स्त्रीच्या आत्मसन्मानाचा, तिच्या इच्छा-आकांक्षेचा आणि तिच्यात दडलेल्या विविध स्त्री-तत्त्वांचा शोध या संग्रहात घेतला आहे.'

डॉ. पी. विठ्ठल म्हणाले की,'चाहुलीचे अनवट नाद या कवितासंग्रहात सीता, अहल्या, मीरा यांसारख्या सांस्कृतिक प्रतिमा आणि मिथकांचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. त्याचबरोबर आधुनिक काळातील शॉपिंग मॉल्स आणि डे-नाईट शिफ्ट्स करणाऱ्या स्त्रियांच्या जगण्याचा ताळेबंदही मांडला आहे.'

ज्येष्ठ कवयित्री ललिता गादगे यांनी कवयित्री प्रिया धारूरकर यांच्या कवितेचे बदलेले स्वरूप आणि तिचे भावविश्व उलगडून दाखवले. मराठीतली ही समर्थ आणि सक्षम कविता असून, तिने आपली वेगळी ओळख जपल्याचे निरीक्षण आवर्जुन नोंदवले. तर डॉ. सर्जेराव आत्माराम जिगे यांनी 'कविता उदंड झाल्याचे अनेक जण म्हणतात. मात्र, जास्त कविता लिहिली गेली, तर बिघडले कुठे?' असा सवाल केला. 'वादळ आले की, पालापाचोळा उडून जातो. मात्र, जड वस्तू राहते. तसेच कवितेचेही आहे. अस्सल कविता टिकतेच,' अशा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

प्रिया धारूरकर यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. 'आपल्यावर भाषेचे संस्कार आईने केले. तिच्यामुळेच ही कविता फुलली,' असे आवर्जुन सांगितले. 'तब्बल दहा-ते बारा वर्षांनी कवितासंग्रह येतोय. या काळातले प्रतिबिंब त्यात उमटले आहे. अनुभवाने आणि कवितेने आपल्याला अधिक पोक्त केल्याचे' त्या म्हणाल्या. तर प्रिया धारूरकर यांच्या आई मालती राघवेंद्र मुरुगकर यांनी 'मुलीचा कवितासंग्रह आपल्या हस्ते प्रकाशित होतोय यापेक्षा आनंद आणखी कुठला? आपल्या मुलीचे असे कोडकौतुक होताना छान वाटतं,' अशी प्रांजळ भावना व्यक्त करून सर्वांशी अनौपचारिक संवाद साधला. विजय पांचाळ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. अक्षरसूक्त साहित्य मंडळ, मुक्तसृजन साहित्य संस्था, कैलास पब्लिकेशन, शताब्दी काव्य मंडळाचे सदस्यांसह शहरातील महत्त्वाचे कवी, रसिक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# बारामती येथे प्रेमसंबंधातून आत्महत्या : तिघांवर गुन्हे दाखल



**बारामती :** तालुक्यात रुई बयाजीनगर येथे एका २३ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. प्रेमसंबंधातून होत असलेल्या मानसिक त्रासाला कंटाळून त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप आहे. या प्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत तरुणाचे नाव विक्रम उर्फ बबलू नवनाथ कोळपे (वय २३, रा. रुई बयाजीनगर, ता. बारामती) असे आहे. विक्रम कोळपे यांचे मामा सत्यवान आप्पा इंगळे (रा. सोलापूर) यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी सृष्टी विकास मते आणि तिच्या पालकांविरोधात (सर्व रा. खडकवासला, पुणे) भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०८, ३५१(२), ३५१(३), ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, विक्रम आणि सृष्टी मते यांच्यात मागील पाच वर्षांपासून प्रेमसंबंध होते. फिर्यादीनुसार, सुरुवातीला सृष्टीने लग्नाचे आश्वासन दिले होते; मात्र नंतर घरच्यांचा विरोध असल्याचे सांगत तिने लग्नास नकार दिला.

२७ डिसेंबर २०२५ पासून सृष्टी आणि तिची बहीण श्रुती यांनी विक्रमला वारंवार फोन करून मानसिक त्रास देणे व ब्लॅकमेल करणे सुरू केले, असा आरोप फिर्यादीत आहे. तसेच, विक्रमला पुणे येथे बोलावून त्याच्या मोबाईलमधील फोटो व चॅटिंग जबरदस्तीने डिलीट करण्यात आल्याचे आणि जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचेही नमूद आहे. सृष्टीचे वडील विकास मते यांनी विक्रमच्या नातेवाईकांना फोनवरून दमदाटी केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, १५ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी विक्रमने राहत्या घरातील किचनमध्ये गळफास घेतला. आत्महत्येपूर्वी त्याने लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये, “आई मला माफ कर. मला ब्लॅकमेल करून खूप मानसिक त्रास दिला जात आहे. त्यामुळे मी हा निर्णय घेत आहे,” असा उल्लेख केला असल्याचे पोलिसांनी सांगितले. या चिठ्ठीत संबंधित व्यक्तींनी दिलेल्या त्रासाचा उल्लेख केल्याचेही समोर आले आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल आनंद कदम करत आहेत.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १७ फेब्रुवारी २०२६


## आदर्श विद्यालयात एस. एस. सी. विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** आदर्श विद्यालयात एस. एस . सी. विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला . या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य सैपन शेख हे होते तर प्रमुख अतिथी श्रमजीवी शिक्षण संस्थेचे सचिव मा. रामकृष्णपंत खरोसेकर हे होते यावेळी पर्यवेक्षक श्रीपाद कुलकर्णी व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुदेश माने यांची उपस्थिती होती . प्रथमत: मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता , सरस्वती देवीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . सत्कार सोहळ्यानंतर वर्षभर घेण्यात आलेल्या बौद्धिक ,क्रीडा व सांस्कृतिक अशा स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देवून गौरव करण्यात आला . तसेच वर्षभर सर्व क्षेत्रांमध्ये आपले कौशल्य दाखवलेले हुशार व संयमी, आज्ञाधारक अशा दोन विद्यार्थ्यांचा आदर्श विद्यार्थी म्हणून गौरव करण्यात आला . त्यात विनायक ज्ञानेश्वर भोसले - 10 वी व कु.मिमरा महमंद रफिक काझी त्या दोन विद्यार्थ्यांचा (सन 2026 ) यावर्षीचे आदर्श विद्यार्थी म्हणून शाळेतर्फे मान्यवरांच्या स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला . तसेच यावर्षीचे उत्कृष्ट खेळाडू म्हणून 5 ते 7वी मधून कु. खुशी काशिनाथ राठोड - 7वी व शहाजी संतोष माने 7वीव 8वी ते 10 वी मधून कु. कृष्णवेणी अभिमन्यू आबाचणे - 10वी तर सुभान शाहबुद्दीन पठाण 10वी या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला . तसेच प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या संस्कृतिक कार्यक्रमातील उत्कृष्ट कलाकारांचा सन्मान करण्यात आला तसेच गणित प्रदर्शनातील उत्कृष्ठ साहित्य निर्मिती करणाऱ्या विद्यार्थ्यांचा व क्रीडा व बौद्धिक स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला . याप्रसंगी प्रमुखअतिथी मा . खरोसेकर साहेब म्हणाले की , यशस्वी होणे ही केवळ नशिबाची गोष्ट नसून तर मित्रांनो ती प्रत्येक व्यक्तीत असलेल्या विशिष्ट चांगल्या गुणांवर आधारित असते जो विद्यार्थी सकारात्मक दृष्टिकोन , दृढइच्छाशक्ती ,चिकाटी, शिस्त आणि वेळेचे नियोजन करतो . आणि स्वत:वर विश्वास ठेवून सतत कांहीतरी नवीन शिकण्याची वृत्ती, नाविन्याचा शोध घेण्याची धडपड बाळगतो तो विद्यार्थी निश्चितच जीवनात यशस्वी होतो . अपयश आले तरीही त्यातून धडा घ्या , यशस्वी व्यक्ती हा अपयश पचवूनच यशापर्यंत आलेला असतो .अपयशाला न घाबरता , झालेल्या चुकांमधून शिकून , दररोज थोडे अधिक प्रयत्न करा , कारण प्रत्येक दिवस आयुष्यात प्रगती करण्याची एक नवी संधी घेऊन येतो हे विसरू नका . या विद्यालयात प्राचार्य शेख सर हे एक अनुभवी व नवीन काहीतरी करण्याची धडपड करणारा माणूस आहे , सतत वेगवेगळे उपक्रम , स्पर्धा , प्रदर्शन अशा कार्यक्रमाचे आयोजन करतात , ते केवळ आपल्या व्यक्तिमत्त्वाचा चांगला विकास व्हावा यासाठीच . आपण जीवनात यशस्वी व मोठी व्यक्ती व्हावी या इच्छेपोटी सतत कांहीतरी कार्यक्रम ठेवत असतात . याचा फायदा घ्या ,आज क्रीडा , सांस्कृतिक व अभ्यासक्रमात नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या यशस्वी व विजेत्या विद्यार्थ्यांना आमच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरव केला आहे त्यांचे खुप अभिनंदन व ज्यांना बक्षीस मिळाले नाही अशांनी निश्चितच पुढच्या वर्षी बक्षीस मिळवावे ,त्यांनी मिळवण्याचा चांगला चिकाटीने प्रयत्न करावा असा संदेश यावेळी दिला .अध्यक्षीय समारोपात प्राचार्य सैपन शेख सर म्हणाले की ' आजचा हा दिवस सर्वांसाठी आनंदाचा आहे कारण तुम्ही वर्षभर अभ्यास क्रीडा सांस्कृतिक अशा विविध स्पर्धेत यश संपादन केलात त्यांच्या यशाचा गौरव करण्याचा आजचा हा क्षण आहे . जीवनात केवळ पुस्तकी ज्ञान महत्त्वाचे नसून आपला शारीरिक मानसिक व बौद्धिक विकास होणे हेच आमच्या विद्यालयाचे ध्येय आहे असून आम्ही सातत्याने बदलत्या काळाची गरज ओळखून सतत नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून यशस्वी विद्यार्थी घडवण्याचा आमच्या सर्व शिक्षकांचा प्रयत्न असतो . प्रामाणिकपणा आणि आत्मचिंतन हेही यश मिळवण्यासाठी आवश्यक गुण आहेत ,तुमचे ध्येय ,उद्देश स्पष्ट असावेत तरच आपल्याला दिशा निवडता येते . सातत्य व चिकाटीने आपले ध्येय वेळेत साध्य कराल तरच आजच्यासारखे तुमचे नेहमी कौतुक होईल .ज्या स्पर्धेत आपण पारितोषिक मिळवत आहात त्या स्पर्धेत तुमच्या स्पर्धकांचे प्रयत्न कुठेतरी कमी पडले आहेत , कुठेतरी योग्य निर्णय घेण्याची क्षमता कमी पडली म्हणूनच तुम्ही विजेता झालात . तर ज्यांना बक्षीस मिळाले नाही अशांनी आत्मचिंतन करावे व निराश न होता पुढील वर्षी जिद्दीने प्रयत्न केलात तर यश आपलेच आहे असे म्हणून दहावीच्या विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक श्रीपाद कुलकर्णी यांनी केले .तर विद्यार्थी मनोगतात दहावीतील विनायक भोसले व सृष्टी शिंदे या दोन विद्यार्थ्यांनी शाळेतील विविध उपक्रम व शिक्षकांचे कौतुक करून आपण दिलेल्या ज्ञानाची शिदोरी हे आमचे उज्वल भवितव्य घडवण्यासाठी निश्चितच उपयोगी पडेल व आम्ही ती समाज उपयोगासाठी उपयोगात आणू अशी ग्वाही निरोपप्रसंगी या दोन विद्यार्थ्यांनी दिली .तर शिक्षकांमधून प्रशांत सोमवंशी हे मनोगत मांडताना म्हणाले की ,निरोप घेऊन जाणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेतील यशासाठी नेमके काय प्रयत्न करावेत हे सांगून या बॅचमधील यशस्वी विद्यार्थ्यांच्या कार्याचा आढावा यावेळी सर्वांसमोर ठेवला व येणाऱ्या बोर्ड परीक्षेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या . तसेच दरवर्षी पाचवीपासून ते दहावीपर्यंत आलेल्या दहावीतील हुशार संयमी व आज्ञाधारक अशा दोन विद्यार्थ्यांना आदर्श विद्यार्थी व आदर्श विद्यार्थिनी म्हणून मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला त्यात विनायक ज्ञानेश्वर भोसले व कु . मिमरा मोहम्मद रफी काजी हे यावर्षीचे आदर्श विद्यार्थी ठरले तर यावर्षीचे उत्कृष्ट खेळाडू 5वी ते 7वी मधून कु .खुशी काशिनाथ राठोड व चि. शहाजी संतोष माने तर 8 वी ते 10वी मधून कु . कृष्णवेणी अभिमन्यू आबाचणे व सुभान शहाबुद्दीन पठाण या विद्यार्थ्यांचा यावर्षीचे विद्यालयातील उत्कृष्ट खेळाडू म्हणून मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षकश्रीपाद कुलकर्णी यांनी मांडले , सूत्रसंचालन श्रीमती पौर्णिमा दाहोत्रे यांनी केले तर पारितोषिक वाचन तात्याराव फडताळे व दयानंद उमाटे यांनी केले ,आभार रंगनाथ चाटे यांनी मांडले .हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरेश शेंडगे , शिवराज सुरवसे ' श्रीमती नीलिमा कुलकर्णी , श्रीमती बेबीसरोजा स्वामी , श्रीमती स्वरूपा चौधरी ,विकास कांबळे यांनी पुढाकार घेतला .

## जातीनिहाय जनगणना, समता विधेयक व फुले पुतळा विटंबना प्रकरणी कठोर कारवाईची मागणी



**छत्रपती संभाजीनगर :** जातीनिहाय जनगणना तात्काळ राबवावी, उच्च शिक्षणात सामाजिक न्याय सुनिश्चित करण्यासाठी UGC समता विधेयक लागू करावे तसेच तेलंगणा येथे महात्मा जोतिराव फुले यांच्या पुतळ्याच्या विटंबना प्रकरणी कठोर कायदेशीर कारवाई करून व्यापक प्रबोधनात्मक उपक्रम राबवावेत, अशी मागणी भारतीय पिछडा शोषित संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.या संदर्भात राष्ट्रपती महोदयांना उद्देशून जिल्हाधिकारी मार्फत वैचारिक निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात भारतीय समाजरचनेतील जात, सत्ता, ज्ञान आणि राज्यसत्ता यांचे ऐतिहासिक संबंध स्पष्ट करत बहुजन समाजाच्या संरचनात्मक वंचिततेचे विश्लेषण करण्यात आले आहे.संघटनेच्या निवेदनात जातीनिहाय जनगणना ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून सामाजिक न्यायाच्या धोरणांसाठी वैज्ञानिक आणि वास्तवाधारित आकडेवारीची गरज असल्याचे नमूद करण्यात आले आहे. आकडेवारीशिवाय समतेचे धोरण प्रतीकात्मक ठरते, असे मत व्यक्त करत बहुजन समाज आर्थिक, शैक्षणिक व प्रशासकीयदृष्ट्या मागासलेला असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.तसेच UGC समता विधेयक लागू करण्याची मागणी करत ज्ञाननिर्मितीवर ऐतिहासिकदृष्ट्या उच्च जातीय घटकांचे वर्चस्व राहिले असून विद्यापीठे ही सत्ता निर्माण करणारी केंद्रे असल्याचे विश्लेषण करण्यात आले आहे. संविधानातील अनुच्छेद 14, 15, 16 आणि 21 च्या आधारे उच्च शिक्षणात समानता सुनिश्चित करणे ही राज्यसत्तेची घटनात्मक जबाबदारी असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.तेलंगणा येथे महात्मा जोतिराव फुले यांच्या पुतळ्याच्या विटंबना प्रकरणी तीव्र निषेध व्यक्त करत अशा घटनांना जातीय वर्चस्ववादी मानसिकतेचे प्रकटीकरण ठरवत कठोर कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. तसेच शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक क्षेत्रात फुले—आंबेडकर—संविधान—समता विचारांवर आधारित व्यापक प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे.निवेदनात जातीनिहाय जनगणना, ज्ञान-सत्तेचे लोकशाहीकरण आणि समता विचारांचे संरक्षण या तीनही मागण्या भारतीय समाजरचनेच्या मूलभूत पुनर्रचनेशी निगडित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मागण्यांची पूर्तता न झाल्यास संवैधानिक मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.हे निवेदन संघटनेचे कार्यकर्ते प्रा. सुदाम चिंचाणे, कल्याण रंधे, शंकर चिंचाणे, प्रा. वसंत हारकळ, प्रभाकर गायकवाड, अशोक तारो आदींच्या वतीने सादर करण्यात आले.


**दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.**

### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |